कोविड-१९ या आजाराला प्रतिबंध करण्यासाठी
पी.पी.ई.कीट व एन-९५ मास्क उत्पादन, वितरण व विक्री
बाबत मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन परिपत्रक क्रमांकः कोविड -२०२०/प्र.क्र.१५९/प्रशा-१
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक: ११, एप्रिल, २०२०.

वाचा:- १) सार्वजनिक आरोग्य विभाग पत्र क्र. करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि. २४.०३.२०२०

२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे पत्र क्र.विविवि-२०२०/प्र.क्र.१३९ / प्रशा- १, दि. २६.०३.२०२०

३)सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना क्र. करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि. ०३.०४.२०२०

४) वस्त्रोद्योग मंत्रालय,केंद्र सरकार यांचे पत्र क्र. F.BN.०.८/४/२०२०/R&D, दि. ०६.०४.२०२०

५) हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळ मर्या.मुंबई यांचे पत्र दि. ०८.०४.२०२०

६) मा.सर्वोच्च न्यायालय,नवी दिल्ली यांचे रिट पिटीशन (सिव्हील) डायरी नं.१०७९५/२०२० व अन्य याचिकांमध्ये दि. ०८.०४.२०२० चे आदेश

शासन परिपत्रक:-

महाराष्ट्र राज्यात दिनांक १३ मार्च २०२० च्या अधिसूचनेनुसार साथरोग नियंत्रण कायदा, १८९७ ची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. तसेच करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी दिनांक १४ मार्च,२०२० च्या अधिसूचनेनुसार कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० नियमावली लागू करण्यात आलेली आहे.करोना रुग्णांवर प्रत्यक्ष उपचार करणाऱ्या आरोग्य सेवेतील वैद्यकीय अधिकारी,परिचारीका व निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांना प्रादुर्भावापासून संरक्षणासाठी पी.पी.ई. किट व एन ९५ मास्कची नितांत आवश्यकता असते. तसेच केंद्र शासनाने दिनांक १ एप्रिल २०२० पासून पी.पी.ई. किट व एन ९५ मास्क या बाबी औषधे म्हणून अधिसूचीत केले आहे.

०२. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २४.०३.२०२० च्या पत्रानुसार कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या आजारावर प्रतिबंध व उपचारास्तव औषधे, वैद्यकीय साहित्य व उपकरणे यांची उपलब्ध विविध दरकरार, शासन उपक्रम व हाफकिन महामंडळाकडील निविदेच्या दरानुसार पुरवठा करण्यास



Scanned with CamScanner

तयार असणाऱ्या पुरवठादारांकडून खरेदी करण्याचे अधिकार जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीला देण्यात आलेले आहेत.

०३. मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी रिट पिटीशन (सिव्हील) डायरी नं. १०७९५/२०२०, जेरील बानाईत वि. केंद्र शासन व इतर रिट पिटीशन मध्ये दि.०८.०४.२०२० रोजी कोविड-१९ रुग्णांवर उपचार करणारे डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांच्यामध्ये कोविड-१९ आजाराच्या प्रादुर्भावास प्रतिबंध होण्याच्या अनुषंगाने पी.पी.ई. किट व एन ९५ मास्कच्या वापराबाबत तसेच . राज्यात आरोग्य सेवा देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात येणारे पी.पी.ई. किट व एन ९५ मास्क दर्जेदार व गुणवत्तापुर्ण व मुबलक प्रमाणात असणे आवश्यक आहे. जेणेकरून त्यांना करोना या साथरोगाचा प्रादुर्भाव होण्याचा धोका निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याचे आदेश दिले आहेत.

०४. सार्वजनिक आरोग्य विभागाचे पी.पी.ई. किट व एन ९५ यांचे उत्पादन,वितरण व विक्री याबाबतची अधिसूचित केलेली दि. ०३.०४.२०२० ची अधिसूचना त्या विभागाच्या दि. ०९.०४.२०२० च्या अधिसूचनेद्वारे रद्द करण्यात आली आहे

०५. यास्तव सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचना व साथरोग कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीतील तरतूदीनुसार पी.पी.ई. किट व एन ९५ मास्क यांचे उत्पादन,वितरण व विक्री याबाबत खालील निदेश देण्यात येत आहेत.

१) पी.पी.ई. किट या बाबीचे विनिर्देश SITRA आणि DRDE या प्रयोगशाळांनी तर एन ९५ मास्क या बाबीचे विनिर्देश ICMR संस्थेने तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई यांच्या दिनांक २६.०३.२०२० च्या पत्रान्वये अन्वये निश्चित करण्यात आलेली आहेत. तसेच केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या दिनांक ०६.०४.२०२० च्या पत्रानुसार पीपीई किट (Body coveralls) प्रमाणित करण्यासाठी अधिकृत मान्यता असलेल्या SITRA आणि DRDE या प्रयोगशाळांची मान्यता असणे आवश्यक आहे.

२) सदर विषयी करण्यात येणारी खरेदी उपरोक्त शासन पत्र, सार्वनिक आरोग्य विभाग,दिनांक २४.०३.२०२० अन्वये निर्मित केलेल्या निर्देशानुसार करण्यात यावी.

३) प्रस्तुत विषयी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन व्हावे व सदर आदेशात नमूद पात्र संवर्ग /व्यक्तींसाठी सदर आदेशची अंमलबजावणी करण्यात यावी.

४) प्रस्तुत विषयी करण्यात येणारी खरेदी केवळ गरजेनुसारच करण्याची दक्षता सर्व संबधितांनी घ्यावी.



Scanned with CamScanner

५) पीपीई किट व एन -९५ यांची दरनिश्चिती व त्याचे विविध संस्थांना वितरण करण्याचे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी व संबधित महापालिका आयुक्त यांना देण्यात येत आहेत.

६) सदर परिपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग,वैद्यकीय आस्थापना (सार्वजनिक आरोग्य विभाग,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, नगरविकास विभाग, ग्रामविकास विभाग, सर्व महानगरपालिका/नगरपालिका, राज्य कामगार विमा योजना इ. लागू राहतील)

७) सदर परिपत्रकातील तरतूदींचे उल्लंघन केल्यास सर्व संबधित साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२००५ व औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम १९४९ मधील विविध तरतूदीनुसार दंडनीय कारवाईस पात्र राहतील.

८) सदर परिपत्रक सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

९) सदर परिपत्रकातील तरतूदी परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील व याबाबतच्या पुढील आदेशापर्यंत लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(डॉ. संजय मुखर्जी)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई
२. प्रधान सचिव, सार्वजनि क आरोग्य वि भाग,मंत्रालय,मुंबई
३. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये वि भाग,मंत्रालय,मुंबई
४. सचिव, आपत्ती व्यवस्थापन,मंत्रालय,मुंबई
५. आयुक्त औषधे व प्रशासन, महाराष्ट्र राज्य
६. सह सचिव (औषधे), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सर्व विभागीय आयुक्त
८. सर्व महापालिका/नगरपालिका आयुक्त
९. सर्व जिल्हाधिकारी
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११.व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्या.,मुंबई



Scanned with CamScanner

१२. आयुक्त, आरोग्य सेवा व संचालक, रा.ग्रा.अ,मुंबई
१३.आयुक्त, राज्य कामगार विमा योजना,मुंबई
१४. संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई
१५.संचालक,आरोग्य सेवा,मुंबई/पुणे
१६.सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
१७. सर्व अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये
१८. सर्व जिल्हा शल्यचिकित्सक
१९. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी



Scanned with CamScanner